# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

जा.क्र.आय/टे.३/चेंजिस इन स्टाफ/2953 दिनांक: 14 MAR 2022

№ 00038

**प्रति,**
**मा.संस्था अध्यक्ष/प्राचार्य/संचालक**
**सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यता प्राप्त शिक्षण संस्था.**

**विषय : सन १९९१ ते १९९९ मध्ये स्थानिक निवड समितीमार्फत निवड करण्यात आलेल्या अधिव्याख्यात्यांच्या देण्यात आलेल्या तदर्थ सेवा - शिक्षकांच्या 'चेंजिस इन स्टाफ' मान्यतेबाबत.**

संदर्भ : १. सहसंचालक,उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग कोल्हापूर यांचे पत्र क्र.शिससं/उशि/कोवि/२६६७-६८, दि.३०.०५.२००९
२. शासन पत्र : बीयुसी-२००९/(१५५/०९)/मशि-५,दि.२६ जून,२००९
३. शासन निर्णय : एनजीसी/१२०१/१८१५/(३८/०१) विशि-४ दि.१८.१०.२००१
४. दि.०७.१०.२०२१ रोजीचे चेंजिस इन स्टाफ मिळणेबाबतचे पत्र.

**महोदय/महोदया,**

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये महाराष्ट्र शासन उच्च शिक्षण विभाग, मुंबई यांनी या संदर्भात पत्र क्र. बीयुसी२००९/(१५५/०९)/मशि-५, दि.२६ जुन,२००९ ने मान्यता देण्यासंदर्भात शिवाजी विद्यापीठास शिफारस केली होती. त्यास अनुसरून शिवाजी विद्यापीठाने पत्र क्र.संलग्नता/टे-१/एमएके/५७९४, दि.१४/०८/२००९ ने उभी मान्यता दिली असून त्याअनुषंगाने चेंजिस इन स्टाफ (आडवी मान्यता) मान्यता मिळण्याबाबत विनंती पत्रे या कार्यालयास प्राप्त झाली होती. यास अनुसरून आपणांस आदेशान्वये कळविण्यात येते की, दि.१९.०९.१९९१ ते दि.११.१२.१९९९ या कालावधीतील स्थानिक निवड समितीमार्फत नियुक्त करण्यात आलेल्या अधिव्याख्यात्यांना उपरोक्त संदर्भ क्र ०२ शासन पत्रात नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून तसेच संदर्भ क्र.०३ च्या शासन निर्णयाच्या अधिन राहून रूजू दिनांकापासून तदर्थ स्वरूपात मान्यता दिल्या आहेत. अशा अधिव्याख्यात्यांचे चेंजिस इन स्टाफ (आडवी मान्यता) मान्यतेसाठी विद्यापीठाच्या विहीत नमून्यातील चेंजिस इन स्टाफ फॉर्म पूर्ण भरून प्राचार्य अथवा संचालक यांच्या शिफारशीसह सादर करणे आवश्यक आहे. फॉर्म सोबत विद्यापीठ मान्यता शैक्षणिक कागदपत्र व इतर अनुषंगिक कागदपत्र जोडणे आवश्यक आहे. सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून हे परिपत्रक आपल्या महाविद्यालयातील सर्व संबधित शिक्षकांच्या निदर्शनास आणावे.

**कळावे,**

आपला विश्वासू

**उपकुलसचिव**
संलग्नता टी-१ विभाग
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

D:\Changes in staff /sub